REGISTERED No. B. 3434




# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति। —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १३ पुणें, बुधवार तारीख २६ फेब्रुवारी १९४७ अंक ९

मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीच्या
केंद्रस्थानीं असलेली

**शेतकऱ्यांची प्रांतिक बँक**

म्हणजेच

**बॉम्बे प्रॉव्हिन्शियल को-ऑपरेटिव्ह बँक. लिमिटेड**

( सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली )
स्थापना १९११


—मुख्य कचेरी—
सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरियल बिल्डिंग
९, बेक हाऊस लेन, कोट, मुंबई.

शाखा ५०

**खेळतें भांडवल रु. ७,३१,००,०००**

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी
स्वीकारल्या जातात
आणि
इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा
व्यवहार केला जातो.

—पूर्ण माहितीकरितां हेड ऑफिसकडे लिहा—
व्ही. पी. वर्दे
ऑ. मॅनेजिंग डायरेक्टर.



**सारस्वत**

**को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड**

[स्थापना १९१८]सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई
टे. नं. ३१६७५ ३१-१-१९४७

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल ... | रु. ५,००,००० |
| विक्रीस काढलेलें भांडवल | रु. ४,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल ... | रु. ३,९६,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड्स ... | रु. २,०४,००० |
| ठेवी ... | रु. ६८,५९,००० |
| एकूण खेळतें भांडवल ... | रु. ७५,००,००० |

**स्पेशल सेव्हिंग्ज डिपॉझिट स्कीम**

व्याज : २ टक्के

बँकेचे सर्व व्यवहार केले जातात.

—विशेष माहितीसाठीं लिहा अगर भेटा —

व्ही. पी. वर्दे, बी. कॉम्. चेअरमन | एस. व्ही. संझगिरी, बी. कॉम्. सेक्रेटरी

सब-ऑफिस : दादर, ( बी. बी. रेल्वे स्टेशनसमोर )

लोकांच्या विश्वासास पात्र झालेलें

**दी डेक्कन इंजिनिअरिंग, लिमिटेड.**

माधवनगर ( बुधगांव ) एम्. एस्. एम्. रेल्वे

| नांगर | —यांचे— | चरक |
|---|---|---|
| किसान नं. १०१ ( सहा ते आठ बैली ) | | विश्वास ( चार बैली ) |
| किसान नं. १०२ ( चार ते सहा बैली ) | | वासुदेव ( दोन बैली ) |
| किसान नं. १०५ ( दोन ते चार बैली ) | | राजा ( एक बैली ) |

'मधुकर' ( सात फण्याचे ) कोळपें ( दोन बैली )

**एजंटस्, स्टॉकिस्टस् नेमणें आहेत**

## विविध माहिती

**कापडाच्या वाजवी किंमती**—कपास, कापड आणि सूत ह्यांची रास्त किंमत सुचविण्याचें काम एका कमिटीकडे देण्यांत आलें आहे. टेक्स्टाइल कमिशनर श्री. धर्मवीर, हे तिचे अध्यक्ष आहेत. कमिटीच्या सूचनांवर कमॉडिटीज ॲडव्हायसरी बोर्डाचा सल्ला घेऊन सरकार आपला निर्णय जाहीर करील.

**उसाच्या लागवडीचा अंदाज**—१९४६-४७ च्या उसाच्या लागवडीचा हिंदी सरकारी अंदाज प्रसिद्ध झाला आहे. १९४५-४६ मध्यें हिंदुस्थानांतील एकूण लागवड ३९ लक्ष, १७ हजार एकर होती ती आतां ३८ लक्ष, २० हजारांवर आली आहे, असें त्यावरून दिसतें. हिंदुस्थानांतील लागवडीपैकी ५१.२% लागवड एकट्या संयुक्त प्रांतांत होते. तेथील उसाचें क्षेत्र १ लक्ष एकरांनीं कमी झालें आहे.

**मि. रूझवेल्ट ह्यांच्या चरित्राचा चित्रपट**—अमेरिकेचे माजी अध्यक्ष, मि. रूझवेल्ट ह्यांच्या आयुष्यक्रमाचा एक चित्रपट तयार करण्यांत येत आहे. पूर्वीच्या चित्रपटांतील जरूर ते भाग कापून आणि जोडून हा चित्रपट बनविला जाईल.

**अमेरिकेची कोळशाची मदत नाकारली**—अमेरिकन कोळसा युरोपकडे रवाना होत आहे. त्यांतील कांहीं कोळसा इंग्लंडकडे पाठविण्यास अमेरिका तयार होती. परंतु युरोपांतील कोळशाची परिस्थिति बिकट असतांना त्याला मिळावयाचा कोळसा इंग्लंडनें घेणें बरें नाहीं असें सांगून ब्रिटिश पंत प्रधान मि. ॲटली यांनीं प्रेसिडेंट ट्रूमन ह्यांची मदत आभारपूर्वक नाकारली आहे.

**मंत्रि शिष्टमंडळाच्या भेटीचा खर्च**—ब्रिटिश मंत्रि शिष्टमंडळ हिंदुस्थानांत आलें होतें, त्याच्यासाठी एकूण सुमारें साडेचार लक्ष रुपये खर्च आला. अर्थात्, तो खर्च ब्रिटिश सरकारनें केला.

**पौंडी शिलका आणि युद्धप्रयत्न**—ग्रेट ब्रिटनमधील साठलेल्या पौंडी शिलकांच्या परतफेडीच्या वाटाघाटींत, देशांनीं युद्धप्रयत्नास लावलेला हातभार अवश्य विचारांत घेतला पाहिजे, असें ब्रिटिश फडणीस डॉ. डाल्टन ह्यांनीं कॉमन्स सभेंत सांगितलें.

**ट्रॅक्टरचा कारखाना**—ट्रॅक्टर तयार करण्याचा एक कारखाना मद्रास प्रांतांत लवकरच स्थापन होणार आहे. त्यास २ कोटि रुपये खर्च येईल. कारखान्यांत दररोज एक ट्रॅक्टर तयार होऊं शकेल.

**ट्वेन्टिएथ सेंचरी फंड**—आर्थिक प्रश्नांचा अभ्यास व संशोधन करणारी वरील नांवाची एक अमेरिकन संस्था आहे. अमेरिकन भांडवल व तज्ज्ञ ह्यांच्या उपयोगानें इतर देशांची प्रगति कशी होईल आणि त्यांतील राहणीचें मान कसें सुधारेल, हें प्रस्तुत संस्था पहाणार आहे. तिनें तुर्कस्तानापासून आपल्या कामास प्रारंभ केला आहे.

**निकेलचे रुपये**—निकेलचे रुपये हिंदुस्थानांत लवकरच सुरू होतील. त्यासाठी एक बिल असेंब्लींत मांडण्यांत आलें आहे. "नाण्याच्या रुपयापेक्षा कागदाची नोटच आतां पुष्कळांना सोइस्कर वाटूं लागली आहे आणि ज्यांना धातूचा रुपयाच हवा त्यांचेसाठी निकेलचे रुपये काढले तरी चालण्याजोगें आहे; तेव्हां रुपयांतील चांदीची बचत कां करू नये?" असा खुलासा करण्यांत आला आहे.

## मुंबई सरकारचें अंदाजपत्रक

**नवीन कर कोणताही नाहीं !**

( आंकडे लक्ष रुपयांचे )

| | १९४५–४६ (पक्का हिशेब) | १९४६–४७ (दुरुस्त अंदाज) | १९४७–४८ (कच्चा अंदाज) |
|---|---|---|---|
| उत्पन्न | ३४९६·८७ | ३६११·३४ | ३८९१·२६ |
| खर्च | ३४१२·६३ | ३६०३·०३ | ३८८५·३३ |
| शिल्लक | ८४·२४ | ८·३१ | ५·९३ |

**संयुक्त राष्ट्रसंघटनेची वर्गणी**—संयुक्त राष्ट्रसंघटनेस हिंदुस्थानानें १९४६ सालीं एकूण खर्चाच्या ४·०९% इतकी वर्गणी द्यावी असें ठरलें होतें. १९४७ मधील वर्गणी खर्चाच्या ३·०९% ठरली आहे. १९४६ सालीं त्याप्रमाणें २६,२१,६९० रु. देण्यांत आले. परंतु, १९४७ सालीं खर्च वाढल्यामुळें हिंदुस्थानाच्या वर्गणीचा शतमानानें हिस्सा कमी झाला तरी प्रत्यक्ष आंकडा मात्र २६,१४,२५० रु. भरत आहे. शतमानानें हिस्सा कमी होण्याचें कारण संघटनेच्या सभासद-राष्ट्रांची संख्या वाढली आहे, हें होय.

**तेलाचा शोध**—सिंध आणि पंजाब येथें तेलाच्या शोधार्थ विहिरी खणण्याचें काम सुरू झालें आहे. पंजाबांत अटकेजवळ एक ७,००० फुटांची विहिर खणण्यांत आली आहे. युद्धापूर्वी ह्या विहिरीसाठी बर्मा ऑइल कंपनीनें ५ कोटि रुपये खर्च केले होते आणि प्रत्यक्ष तेल मिळेपर्यंत आणखी ५ कोटींचा खर्च होईल. सिंधमध्यें लखारा येथील विहिर ८ ते १० हजार फूट खोल जाईल व तींत तेल लागलें नाहीं तर दुसऱ्या ठिकाणीं नवी विहिर खोदावी लागेल.


**पेटंट व शोध यांचें प्रदर्शन**

हिंदुस्थान व मुंबई सरकारच्या प्रोत्साहनानें व आश्रयानें पुरस्कार केलेलें

३ मार्च ते ३ एप्रिल १९४७

जागा : पुणें सर्व्हन्ट म्युनिसिपल कौन्सिल हॉल, पुणें रेल्वे स्टेशनसमोर

माहितीसाठी : लॉर्ड रे महाराष्ट्र औद्योगिक संग्रहालय पुणें २ यांजकडे लिहावें.




—सर्व प्रांतांतील—
सुती – गरम – रेशमी
—खादीचा उत्तम संच—

**खादी मन्दिर**

२६२, बुधवार पेठ, ढमढेरे बोळाजवळ, पुणें २

# अर्थ

बुधवार, ता. २६ फेब्रुवारी १९४७


संस्थापक

संपादक :
श्रीपाद वामन काळे

वा. वर्गणी ट. ख. सह ६ रु. किरकोळ अं. २ आणे.

प्रो. वा. गो. काळे


## हिंदी रेल्वेजचें अंदाजपत्रक

हिंदुस्थान सरकारचे वाहतुक मंत्री, डॉ. जॉन मथाई, ह्यांनीं ता. १७ रोजीं मध्यवर्ती असेंब्लीस १९४७-४८ चें रेल्वेजचें अंदाजपत्रक सादर केलें आहे. सध्याचे दरानें हिशेब केला असतांना, अंदाजपत्रकाप्रमाणें वहातुकीपासून १८२ कोटि रुपये उत्पन्न होईल आणि व्यवस्थेचा खर्च १३५½ कोटि रुपये भरेल. घसारा फंडांत १५ कोटि ३४ लक्ष रु., ५ कोटि रु. बेटरमेंट फंड, ५ कोटि रु. रेल्वे रिझर्व्ह, ७½ कोटि रु. मध्यवर्ती सरकारास देणगी आणि २५ कोटि, ५८ लक्ष रु. व्याज, ह्याप्रमाणें रकमांची तरतूद केल्यावर १९४७--४८ च्या हिशेबांत १०½ कोटींची तूट रहाते, ती भरून काढण्यासाठीं उतारू व माल ह्यांच्या वाहतुकीचे दर वाढविण्यांत यावयाचे आहेत. म्हणजे, हे दर वाढवून मिळावयाच्या रकमेपैकी ७½ कोटि रुपये मध्यवर्ती बजेटांत समाविष्ट व्हावयाचे आहेत आणि रेलवेजना फक्त ३ कोटि रुपयेच मिळावयाचे आहेत. उतारूंच्या दरांत रुपयास एक आणा ह्याप्रमाणें वाढ केली म्हणजे ती ४½ कोटि रुपये उत्पन्न देईल. मालवाहतुकीचे दरांतील वाढ ५½ कोटि रुपये देणार आहे. ह्या वाढीचा धान्यावर बोजा दरशेरास एक पै पेक्षां अधिक बसणार नाहीं, त्याचप्रमाणें कापडासहि दर वारास एक पै पेक्षा ज्यास्त रकम द्यावी लागणार नाहीं, अशी दक्षता घेतली जाईल. उतारूंच्या दरांतील वाढ १ मार्च १९४७ पासून व मालाच्या दरांतील वाढ १ एप्रिल १९४७ पासून अंमलांत येईल. प्रांतिक सरकारें मोटारवाहतुकीच्या राष्ट्रीयीकरणाच्या योजना तयार करतील, त्यावेळीं त्यांत गुंतविण्यासाठी १½ कोटि रुपयांची तरतूद अंदाजपत्रकांत करण्यांत आली आहे.

मध्यवर्ती सरकारचीं सूत्रें हंगामी सरकारनें हातीं घेऊन अद्याप फार काळ लोटलेला नाहीं. वहातुक मंत्री मि. मथाई ह्यांचेकडे वहातुकीचें खातें येऊन एक महिना फार तर झाला असेल. हंगामी सरकारची आजची परिस्थिति हीहि दीर्घकालीन योजना करण्यास किंवा महत्त्वाचे निर्णय करण्यास फारशी अनुकूल नाहीं. ही पार्श्वभूमि लक्षांत घेतल्यास रेल्वेजचें अंदाजपत्रक वैशिष्टयपूर्ण कां नाहीं, हें लक्ष्यांत येईल. पूर्वीच्या सरकारनेंहि ह्यापेक्षां वेगळें अंदाजपत्रक मांडलें असतें, असें कांहीं वाटत नाहीं. युद्ध संपलें असलें तरी कामगारांचें वेतन, मालाची किंमत इत्यादींचा खर्च वाढत्या प्रमाणावर आहे आणि उत्पन्न मात्र कमी होण्याचीं चिन्हें दिसत आहेत. लष्करी वहातुक थंडावली असून मोटारींच्या वहातुकीची स्पर्धा आतांच वहातुकमंत्र्यांस भेडसावूं लागली आहे. उतारूंच्या व मालाच्या वहातुकीचे दरांत वाढ करून तात्पुरती योजना आज पुरी वाटली तरी थोड्याच अवधींत उत्पन्न-खर्चांतील खिंड रुंदावत जाईल हें उघड आहे. सरकारी मालकीच्या रेलवेजचा संसार आंतबट्याचा होऊं न देण्याचा अवघड प्रश्न लवकरच उपस्थित होईल. आजच्या अंदाजपत्रकांत त्याची केवळ चुणूक दिसत आहे. वहातुकीचे दरांतील वाढ, करवसुलीप्रमाणें; चलनविस्तारास आळा घालण्यास सहाय करील अशी वहातुकमंत्र्यांची अपेक्षा आहे. दरवाढीचें समर्थन करण्यासाठी हा मुद्दा त्यांनीं हाताशीं धरला तरी जनतेस तो मुळींच पटण्याजोगा नाहीं हें उघड आहे. सर्व वर्गांच्या उतारूंस एकाच प्रमाणांत ( ६¼% ) जादा भाडें द्यावें लागणार आहे. तिसऱ्या वर्गाच्या उतारूंपेक्षा वरच्या वर्गांच्या उतारूंवर अधिक बोजा टाकलेला नाहीं, ही गोष्टहि सहज लक्ष्यांत येण्याजोगी आहे.

## कापड–गिरणी मालकांतर्फे खुलासा

मुंबई कायदेमंडळाचे एक सभासद आणि अहमदाबाद गिरणी कामगार–संघाचे चिटणीस श्री. खंडुभाई देसाई यांनीं हिंदी कापड-गिरण्यांच्या युद्धकालीन व्यवहाराचा आढावा घेणारा अहवाल तयार केलेला आहे. सदर अहवालांत गिरणी–मालकांच्या विरुद्ध जो पुरावा मांडण्यांत आला आहे, त्याला टेक्स्टाईल कंट्रोल बोर्डाचे अध्यक्ष श्री. ठाकरसी आणि मुंबई व अहमदाबाद येथील गिरणी–मालक संघांचे अध्यक्ष यांनीं उत्तर दिलेलें आहे. श्री. खंडुभाई देसाई यांनीं आपल्या अहवालांत अतिशयोक्तिपूर्ण विधानें केलीं असून जनतेनें त्यावरून आपलीं मतें बनवूं नयेत अशी विनंति गिरणी–मालकांतर्फे करण्यांत आलेली आहे. गिरण्यांच्या कापडाच्या उत्पादनांत झालेली घट ही गिरणी–मालकांच्या निष्काळजीपणाचा, आळशीपणाचा आणि कार्यक्षमतेच्या अभावाचा परिणाम आहे असा आरोप श्री. देसाई यांनीं केलेला आहे. गिरणी मालकांच्या उत्तरांत कापडाच्या घटलेल्या उत्पादनाचीं कारणें मुख्यतः दोन देण्यांत आलेलीं आहेत: पहिलें असें कीं, मजूर लहानसहान कारणावरून संपावर जातात आणि काम करतात तेव्हांही हात आंखडून करतात. दुसरें असें कीं, ऑगस्ट १९४६ पासून ५४ तासांच्या कामाच्या आठवड्याऐवजीं ४८ तासांचा आठवडा करण्यांत आला. त्याशिवाय १९४४ ते ४६ च्या काळांत कोळशाचा पुरवठाही गिरण्यांना पुरेसा झाला नाहीं. त्यामुळेंही गिरण्यांच्या उत्पादनांत घट झाली असें मालकांचें म्हणणें आहे.

हिंदी कापड गिरण्यांचा धंदा केवळ १५० मॅनेजिंग एजन्सी कंपन्यांच्या ताब्यांत आहे, या श्री. देसाई यांच्या विधानाला विरोधी पुरावा म्हणून या विषयासंबंधीं पुढील आकडे देण्यांत आले आहेत. गिरणी–मालकांनीं दिलेल्या माहितीप्रमाणें एकंदर ४२१ गिरण्या असून त्या ३५७ मॅनेजिंग एजन्सी कंपन्यांच्या हातीं आहेत. या मॅनेजिंग एजन्सी कंपन्यांपैकीं २ कंपन्या प्रत्येकी ५ गिरण्या नियंत्रित करतात, व सुमारे ३१४ मॅनेजिंग एजन्सी कंपन्या फक्त एकएका गिरणीवरचं हुकमत चालवितात. युद्धपूर्वकालांत हिंदी नागरिक कापडासाठीं दर वर्षीं दरडोई १ रु. १२ आ. देत असे श्री. देसाई यांचें म्हणणें आहे. युद्धपूर्व कापडाच्या किंमती कमी असल्यामुळें चढत्या बाजारांतील ६ रु. १२ आ. ही किंमत वाजवीपेक्षा अधिक फुगलेली दिसते असें गिरणी मालकांचें म्हणणें आहे. गिरणी मालकांच्या मतें गिरण्यांच्या नफ्याचे निव्वळ आकडे श्री. देसाई यांनीं हिशेबांत घ्यावयास पाहिजे होते. त्याऐवजीं श्री. देसाई यांनीं एकंदर ग्रॉस नफ्याचे आकडे अहवालांत घेतले आहेत. या आंकड्यामुळें गिरण्यांचा नफा भरमसाट दिसतो, असें गिरणी मालकांतर्फे उत्तर देण्यांत आलेलें आहे.

# स्फुट विचार

## रिझर्व्ह बँक सरकारी मालकीची करावी काय ?

हिंदी रिझर्व्ह बँकेचें राष्ट्रीयीकरण करण्यांत यावें, असा एक ठराव मध्यवर्ती असेंब्लींत मुस्लिम लीगचे मि. तामिझउद्दिन खान ह्यांनीं मांडला व थोड्या चर्चेनंतर परत घेतला. कांहीं थोड्याशा भागीदारांच्या हिताचे दृष्टीनें बँकेचा कारभार चालावा, का तो सबंद जनतेच्या हिताचे दृष्टीनें चालविण्यांत यावा, हा मुद्दा त्यांनीं पुढें मांडला. "रिझर्व्ह बँकेच्या शेअर्सवर भागीदारांना फक्त ४% च डिव्हिडंड मिळत आहे. विधिमंडळानें केलेल्या कायद्याप्रमाणें बँक काम करीत आहे. तेव्हां तिच्या राष्ट्रीयीकरणाची आवश्यकता नाहीं" असें सर कावसजी जहांगीर ह्यांनीं सांगितलें. मि. मनु सुभेदार ( कॉंग्रेस ) ह्यांनीं ठरावास पाठिंबा दिला. "आज येथें दररोज इतक्या गोष्टींच्या राष्ट्रीयीकरणाची चर्चा चाललेली आहे, कीं तिची माहिती ताजी राखणेंहि अशक्य झालें आहे. हिंदुस्थानांत कोणत्याहि दुसऱ्या धंद्याचें राष्ट्रीयीकरण होण्यापूर्वी रिझर्व्ह बँकेचें राष्ट्रीयीकरण होणें इष्ट ठरेल." हें श्री. मनु सुभेदार ह्यांचें म्हणणें व्यावहारिक आहे. बँकेच्या राष्ट्रीयीकरणास असेंब्लींत बराच पाठिंबा आहे, ह्याची नोंद घेऊन ह्या प्रश्नाच्या विचाराचे वेळीं त्याकडे लक्ष पुरवीन, असा फडणवीस मि. लियाकत अलि खान ह्यांनीं समारोप केला.

---

## अखिल भारतीय कामगार परिषद

अखिल भारतीय कामगार परिषदेचें वार्षिक अधिवेशन कलकत्ता येथें नुकतेंच पार पडलें. हिंदी राजकारणांत यापुढें श्रमजीवी वर्गाच्या संघटनांना अधिकाधिक महत्त्व प्राप्त होत जाणार आहे, आणि त्यांत आश्चर्य करण्यासारखेंहि कांहीं नाहीं. हिंदी कामगार वर्ग दिवसानुदिवस जागृत होत असून इतर देशांतील कामगार वर्गाच्या पावलावर पाऊल टाकित आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. कामगार संघटनांना अजून पुष्कळच मार्ग आक्रमण करावयाचा आहे. त्या वर्गांत अजून एकमुखी संघटना व्हावयाची असली तरी स्वातंत्र्योन्मुख हिंदुस्थानांत त्यांना महत्त्वाची जागा आहे यांत शंका नाहीं. त्या दृष्टीनें या अधिवेशनांत मंजूर झालेला मुख्य राजकीय ठराव अर्थपूर्ण आहे. या ठरावांत ध्येय म्हणून हिंदुस्थानांत समाजवादी शासनसंस्था स्थापन करण्याची घोषणा करण्यांत आलेली आहे. हिंदुस्थानच्या अलीकडील राजकारणावर युरोपमधील नव विचारांची सांवली पडलेली असल्यामुळें या उद्घोषित ध्येयांत नवल वाटण्यासारखें कांहींच नाहीं. तथापि तूर्त तरी ब्रिटिश राजवट या देशांतून कशी घालवावी हाच प्रश्न महत्त्वाचा आहे. परिषदेनें आपल्या ठरावांत या नजीकच्या कामगिरीचा स्पष्ट उल्लेख केलेला आहे ही समाधानाची बाब आहे. सध्याची घटनासमिति परिषदेला मान्य नसून सार्वत्रिक मतदानाच्या अधिकारावर उभारलेली घटना समिती हवी अशी मागणी करण्यांत आलेली आहे. तूर्त तरी ही मागणी पुरी होणें अशक्यच आहे. हिंदुस्थान सरकारच्या युद्धोत्तर योजनांविषयीं परिषदेंत नापसंती दर्शविण्यांत आलेली असून त्यासंबंधी परिषदेची भूमिका समजावून घेणें अवश्य आहे.

---

## नव्या भांडवल उभारणीस परवानगी

१७ फेब्रुवारी अखेर संपलेल्या आठवड्यांत ११ कंपन्यांना ४,२३,८०,००० रुपयांच्या भांडवल उभारणीस परवानगी मिळाली. त्यांतील कांहींचा तपशील खालीं दिला आहे.

१ बँक ऑफ म्हैसूर लि., १०,००,००० रु., नवे शेअर्स काढण्यासाठी.

२ म्हैसूर सिल्क फिलेचर्स लि., ४,००,००० रु., नवे शेअर्स काढण्यासाठी.

३ मझहर स्टूडिओज लि., मुंबई, २५,००,००० रु., सिनेमा स्टूडिओ उभारण्यासाठी. ( नवी कंपनी )

४ ए. अँड एफ. हार्वे लि., मदुरा, ३०,००,००० रु., बोनस शेअर्स वाटण्यासाठी.

५ विक्रम पेपर मिल्स लि., कलकत्ता, ७५,००,००० रु., कागदाच्या उत्पादनासाठी. ( नवी कंपनी )

६ इंडिया लँड अँड बिल्डिंग सो. लि., मुंबई, १,००,००,००० रु., घरें बांधणें वगैरेसाठी. ( नवी कंपनी )

---

## दी पूना ऑईल मिल्स लिमिटेड

वरील खाजगी कंपनी नुकतीच पुण्यांत स्थापन झाली असून कंपनीचें एकूण अधिकृत भांडवल २ लक्ष रुपयांचे प्रत्येकीं एक हजार रुपयांच्या ४½% क्युम्युलेटिव्ह ऑर्डिनरी दोनशें शेअर्समध्यें विभागलें गेलेलें आहे. कंपनीच्या उभारणीस "अर्था"च्या वाचकांचे परिचयाचे श्री. वसंत विष्णु लोणकर, एम्. ए., बी. कॉम. यांचें विशेष सहाय्य झालेलें आहे. श्रीमंत गजानन विश्वनाथ साळवेकर, बी. ए. ( मुंबईच्या सुप्रसिद्ध सरदारगृहाचे मालक, बृहन्-महाराष्ट्र शुगर सिंडिकेट, न्यू सिटिझन बँक, इत्यादि नामांकित कंपन्यांचे डायरेक्टर ) हे कंपनीस अध्यक्ष लाभले असून संचालक मंडळांत श्री. लोणकर यांचे शिवाय मुंबई लेजिस्लेटिव्ह असेंब्लीचे सभासद व हिंदुस्थान स्पन पाईप्सचे डायरेक्टर श्री. रामचंद्रराव भगवंतराव गिरमे, भोर स्टेट बँकेचे डायरेक्टर व पुण्यांतील एक प्रमुख व्यापारी श्री. मच्छराज व्यंकटेश शिंगरे, विक्रम शुगर मिलचे मॅनेजर श्री. ल. व्यं. सातपुते आणि श्री. केशव रंगनाथ देशपांडे, बी. ए. ह्यासारखी वजनदार मंडळी आहेत.

अलीकडे पुण्याची लोकसंख्या बरीचशी वाढलेली आहे व सर्व प्रकारच्या गृहोपयोगी तेलांची मागणी विशेष वाढलेली आहे. पुण्यांत रोज तीन-चार हजार डब्यांची उलाढाल सहज होऊं शकते व मालाला भावहि चांगला मिळतो. मात्र पुणें शहराला ह्या जिनसाकरतां सर्वस्वीं परजिल्ह्यांकडे पहावें लागतें. त्या मानानें स्थानिक उत्पादन फारच बेताचें आहे. त्यामुळें हा व्यवसाय उत्तम तऱ्हेनें चालू शकेल यांत शंका नाहीं. कंपनी खाजगी असल्याकारणानें ५० चे वर शेअरहोल्डर्स होऊं शकत नाहींत. तसेच कंपनीचा शेअरहि मोठा आहे. परंतु लहान रक्कम गुंतविणारांना सोईस्कर व्हावें ह्या दृष्टीनें शेंभर रुपयांच्या पटींत मुदतीच्या ठेवी एक वर्षास ४%, दोन वर्षास ५%, तीन वर्षास ६% टक्के या दरानें स्वीकारण्याची योजना ठेवलेली आहे. ह्या योजनेचा "अर्था"चे वाचक अवश्य फायदा घेऊं शकतील. कंपनीचे मॅनेजिंग एजंटस मे. लोणकर देशपांडे अँड कंपनी हे असून कंपनीचें ऑफीस १२८६ अ शिवाजीनगर, पुणें ५ हें आहे. ठेवीदारांच्या सोयीसाठीं श्री. व. वि. लोणकर यांच्या लक्ष्मीरोड, किताब बिल्डिंग, पुणें २, या ऑफीसमध्यें ( वेळ स. १०॥ ते १२॥ ) ठेवी स्वीकारण्याची सोय केलेली आहे.

# भाडेकरूंच्या संघटनेची आवश्यकता

लेखकः—श्री. श्री. वि. माडगीळ, एम्. ए., एलएल्. बी.

युद्धकाळांत शहरवासियांना जागेची तरी भ्रांत पडूं नये म्हणून जगांतील इतर सर्व शहरांप्रमाणें पुण्याला भाडें नियंत्रणाचा कायदा लागूं करण्यांत आला व त्यामुळें पुष्कळशा नागरिकांची भाडेवाढीच्या कात्रींतून तरी सुटका झाली. पण त्यामुळें अल्पसंख्याक लोभी मालकांचा बराच चडफडाट झाला व कायद्याच्या अंमलबजावणीच्या या तीन वर्षांच्या काळांत नागरिकांचें मनःस्वास्थ्य या कायद्यानें नाहींसें झालें अशी तक्रार मानभावीपणानें कांहीं घरमालक करूं लागले. या तक्रारींत कांहीं अर्थ आहे का, असा जेव्हां मी विचार करूं लागलों तेव्हां त्या तक्रारींतील वैय्यर्थ्य तावडतोब दिसून आलें. रेंट कंट्रोलरकडे सालाचे ३०० ते ४०० अर्ज आले म्हणजे सर्व पुणें शहर अस्वस्थ झालें आहे अशी समजूत करून घेण्याची कांहीं जरूरी नाहीं. तीन चार लाख लोकवस्तीच्या शहरांत तीन चारशें अर्ज म्हणजे कांहींच नाहींत. उलट जर हा कायदा अस्तित्वांत नसता तर इतक्या अर्जांच्या ऐवजीं एवढे सेशन्स खटले झाले असते ही गोष्ट हे तक्रार करणारे लोक विसरले आहेत.

## कायदा कायम पाहिजे

भाडें नियंत्रण कायदा आणखी चार पांच वर्षें तरी जरूर अस्तित्वांत पाहिजे असें सरकारासहि पटलें असून सरकारतर्फे जो नवीन कायदा होऊं पाहात आहे तो १९५० सालापर्यंत अस्तित्वांत राहील असें या कायद्याच्या मसुद्यांत म्हटलें आहे. परंतु सरकारतर्फे ही जी कालमर्यादा घालण्यांत आली आहे ती अत्यंत अपुरी व असमाधानकारक आहे. शहरांतील घरमालक व भाडेकरी यांचे संबंध नियमन करण्याची जरूरी दिवसेंदिवस वाढत आहे व हा कायदा कायम स्वरूपांत योग्य त्या सुधारणा करून सरकारनें लागूं केला पाहिजे. घरमालक व भाडेकरी यांचे संबंध नियमन करण्याकरतां रेंटकंट्रोलरसारखा एक अधिकारी पुण्यासारख्या मोठ्या शहरांतून कायमचा नेमण्यांत आला पाहिजे व त्याला अशा तक्रारी तावडतोब दूर करण्याचा अधिकार देण्यांत आला पाहिजे.

## भाडेकऱ्यांच्या तक्रारी

भाडेकऱ्यांच्या तक्रारी दिवाणी फौजदारी कोर्टांचे मानानें अगदीं क्षुल्लक पण मनःस्वास्थ्याच्या दृष्टीनें अत्यंत महत्त्वाच्या असतात. नळावर लौकर पाणी भरूं न देणें, भाडेकऱ्याच्या घरासमोर केर टाकणें, त्याच्याकडे कोणी आलें असतां त्याला शिवीगाळ करणें अगर त्याचा अपमान होईल अशी भाषा वापरणें व तंटाबखेडा उत्पन्न करणें, संडास व मोऱ्यांना कुलुपें लावणें, भाडेकऱ्याच्या अंगावर वरून पाणी टाकणें या व अशा अनेक गोष्टींनीं मनुष्य अगदीं बेजारून जातो. मनःशांतीकरतां घरीं येणारा मनुष्य पुनः तप्त होतो व त्यावर त्याला कांहीं इलाज न सापडल्यामुळें पुढें त्रस्त होतो. आमच्या संघाकडे जरी तो आला तरी त्याला आम्हांला तावडतोबीचा व हमखास इलाज सांगतां येत नाहीं व फौजदार अगर न्यायालयें यांच्यापुढें त्याचा टिकाव लागत नाहीं. वीज व पाणी यांच्यासारख्या बाबतींत तावडतोब इलाज न सापडल्यामुळें भाडेकरूंचें जीवन असह्य होत चाललें आहे. या सर्व गोष्टींचा बंदोबस्त तातडीनें करण्याकरतां रेंटकंट्रोलर यासारखा अधिकारी शहरोशहरीं नेमला पाहिजे व त्यानें भाडेकऱ्यांच्या तक्रारी ऐकून त्यांची गैरसोय प्रथम दूर केली पाहिजे व मग न्यायनिवाडा करीत राहिलें पाहिजे. सरकारनें नवीन कायद्याचा जो खर्डा प्रसिद्ध केला आहे त्यांत रेंटकंट्रोलरला हे अधिकार दिलेले नाहींत व त्यामुळें कायद्याचा जसा फायदा भाडेकरूंना मिळावयास पाहिजे तसा तो मिळणार नाहीं. सरकारनें रेंटकंट्रोलरच्या अधिकारांची यादी करून ती प्रसिद्ध केली पाहिजे; तरच भाडेकरूंना त्याला खरी मदत करता येईल. हल्लीं रेंटकंट्रोलरकडे अशा स्वरूपाचे जे अर्ज येतात ते अधिकाराभावी त्यास निकालीं काढावे लागतात व त्यामुळें घरमालकांना जुलूम करण्यास जास्तच जोम चढतो.

## नवीन कायद्यांत प्रत्यक्ष परिस्थितीचें अज्ञान

सरकारनें हा जो नवीन कायद्याचा खर्डा प्रसिद्ध केला आहे तो प्रत्यक्ष अडचणींचा व अनुभवांचा विचार करून बिलकूल केलेला नाहीं, तर मागील पानावरून पुढें चालूं अशा स्वरूपाचा केला आहे. मुंबईचा १९३९ चा भाडेनियंत्रण कायदा व १९४४ चा ७ वा कायदा यांतील कलमें मागें पुढें करून हा खर्डा तयार झालेला आहे. त्यांत आमच्या संघानें अगर इतर संघांनीं केलेल्या सूचनांचा कांहींही विचार केलेला दिसत नाहीं. स्टँडर्ड रेंटची सवलत भाडेकऱ्यांना दिली आहे पण त्याहून जास्त वसूल केलेलें भाडें वसूल करण्याची सोय समाधानकारक केलेली नाहीं. त्याबाबत पूर्वींचेंच अत्यंत क्लिष्ट भाषेंत लिहिलेलें व व्यवहारांत उपयोगी न पडणारें असें कलम ठेवण्यांत आलेलें आहे. रेंट कंट्रोलरनें ठरविलेलें भाडें केव्हांपासून अंमलांत यावयाचें याविषयीं कुठेंच कांहीं उल्लेख नाहीं. त्यामुळें स्टँडर्ड रेंट ठरूनही भाडेकऱ्याला खरा फायदा होत नाहीं. सरकारकडून भाडेकऱ्यांच्या इच्छा ज्या अशा डावलल्या जातात त्या तशा जाऊं नयेत म्हणून आपली संघटना जास्त मजबूत करून तिचें दडपण सरकारवर जरूर पडेल अशी व्यवस्था करावयास पाहिजे.

## संघमंडळाची जरूरी

अशा दृष्टीनें विचार करूं लागलें असतां जागोजाग जे भाडेकरू संघ आज काम करीत आहेत त्यांनीं एकांडी शिलेदारी बंद करून सर्व संघांचें एक मंडळ तयार केलें पाहिजे व त्या मंडळाकरवीं सरकारकडे आपली दाद लावून घेतली पाहिजे. अशा मंडळाची कल्पना अहमदाबादमध्यें भरलेल्या भाडेकरू परिषदेच्या अधिवेशनाच्या वेळीं मांडण्यांत आली व ती तेथील व मुंबईच्या कार्यकर्त्यांनीं तावडतोब स्वीकारली व तसें मंडळ करण्याचा ठराव त्या परिषदेंत एकमतानें पसारही झाला. सुदैवानें सरकारनें हा कायदा बऱ्याच लहान मोठ्या शहरांतून लागू केला आहे व त्यामुळें असे संघ निघण्याची शक्यता वाढलेली आहे. त्याचा फायदा घेऊन हें मंडळ तयार करण्याची चळवळ आपण हातीं घेतली पाहिजे व मंडळाकरवी अखिल मुंबई प्रांतीय घर भाडेकरी परिषद बोलावण्याची खटपट केली पाहिजे.

## पावतीबाबत इशारा

या वर्षीं आमच्या संघाच्या कार्याच्या अनुभवांत जी गोष्ट माझ्या विशेष ध्यानांत आली ती म्हणजे पावतीबाबतची. पुष्कळ मालक पावत्या देत नाहींत व भाडेकरीही मोहबतीखातर ती मागण्याची तसदी लावत नाहींत. त्यामुळें मालकाविरुद्ध कांहीं उपाययोजना करण्याची वेळ आली कीं आमच्या नाड्या यंद पडतात. कारण पावत्या दिल्या नाहींत या गोष्टीचा फायदा घेऊन मालक त्याच्या मनाला वाटेल तितकी थकबाकी भाडेकऱ्यावर काढून त्याचा सूड उगवूं शकेल व अव्वलजातीच्या शस्त्रानें भाडेकऱ्याची अब्रू चव्हाट्यावर मांडेल.

---

# रेल्वे संसाराची आर्थिक-दृष्ट्या छाननी

लेखक—श्री. भास्कर महादेव काळे, एम्. ए., बी. टी.

हिंदुस्थानांतील रेल्वे बहुतेक सर्व सरकारी मालकीच्या आहेत व त्यांचा कारभार रेल्वे बोर्डाकडून पाहिला जातो. रेल्वे बोर्ड मध्यवर्ती कायदेमंडळाला जबाबदार नसून व्हायसरॉयला जबाबदार आहे. १९२५ पासून रेल्वेचें अंदाजपत्रक स्वतंत्र रीतीनें तयार केलें जातें व असेंब्लीपुढें मांडलें जातें. ही व्यवस्था रेल्वेच्या कारभारावर चांगला प्रकाश पाडते.

## थोडी पूर्वपीठिका

हिंदुस्थानांतील रेल्वेच्या कारभाराचें स्वरूप नीटपणें लक्षांत घेण्यासाठीं पुढील गोष्टी लक्षांत पाहिजेत. १८६० नंतर परकी सरकारनें ब्रिटिश भांडवलाला विशेष रीतीनें सवलती देऊन खाजगी कंपन्यांकडून रेल्वेचें बांधकाम केलें. ठराविक काळपर्यंत दरसाल व्याजाची हमी, रेल्वे रस्त्यासाठीं फुकट जमिनी देणें, कंपनी तोट्यांत चालल्यास नुकसानभरपाईची हमी, व ठराविक मुदतीच्या शेवटीं भांडवल विकत घेऊन रेल्वे सरकारनें आपल्या ताब्यांत घेणें अशा त्या सवलती होत्या. इतक्या उदार सवलती दिल्यावर हिंदी रेल्वेजमध्यें ब्रिटिश भांडवल फार मोठ्या प्रमाणांत गुंतविलें गेल्यास नवल तें काय? ह्या परकी भांडवलानें हिंदुस्थानचें सतत आर्थिक शोषण केलें, हिंदुस्थानांतून अदृश्य निर्यातीला उत्तेजन दिलें, ब्रिटिश लोखंड-पोलाद कारखानदारांना कायमचें गिऱ्हाईक मिळवून दिलें, ब्रिटिश तरुणांची रेल्वेंतील वरिष्ठ नोकऱ्यांत वरणी लावली व ब्रिटिशांची राजकीय पकड हिंदुस्थानवर राहण्यास मदत केली.


## रेल्वे कां बांधल्या गेल्या ?

हिंदुस्थानांत रेल्वेचें बांधकाम प्रथम विशेषतः लष्कराच्या हालचालीसाठीं व संरक्षणासाठी करण्यांत आलें. दुसरा उद्देश म्हणजे हिंदुस्थानच्या बंदरांतून परराष्ट्रीय व्यापार—निर्यात व आयात—सुलभ करणें हा होय. हिंदी रेल्वेचा उपयोग विशेषतः इंग्लंडच्या उद्योगधंद्यांना पोषक होईल अशा रीतीनें करण्यांत आला. यासाठीं रेल्वेचे वाहतुकीचे दर परराष्ट्रीय मालाला स्वस्त असे आहेत, परंतु देशांतल्या देशांत अंतर्गत वाहतुकीसाठीं त्या मानानें जास्त आहेत. रेल्वेच्या वाहतुकीच्या दरांतील ही विषमता हिंदी जनतेकडून अनेक वेळां टीकेचा विषय झाला आहे.

## रेल्वेच्या कारभाराचा आर्थिक दृष्ट्या विचार

अंतर्गत वाहतुकीचें—उतारू व माल यांचें—साधन ह्या दृष्टीनें रेल्वेच्या कारभाराचा विचार केला पाहिजे. ह्या दृष्टीनें जनतेची प्रथम अपेक्षा अशी आहे कीं रेल्वेच्या वाहतुकीचे दर स्वस्त व सर्वांना परवडतील असे असले पाहिजेत. दुसरी अपेक्षा म्हणजे रेल्वेमुळें सर्व तऱ्हेच्या अंतर्गत वाहतुकीला पूर्णपणें मदत झाली पाहिजे. म्हणजेच केवळ लष्करी दृष्टीनें रेल्वेचे फाटे आंखले जाऊं नयेत, तर माल व उतारू यांच्या दळणवळणावर मुख्य दृष्टि असली पाहिजे. तिसरी गोष्ट म्हणजे रेल्वे राष्ट्राच्या मालकीच्या असल्यामुळें रेल्वेंतील सर्व दर्जाच्या नोकरवर्गाला योग्य प्रमाणांत वेतन मिळालें पाहिजे, व नोकरांच्या इतर सुखसोईकडे लक्ष दिलें पाहिजे. चवथी गोष्ट म्हणजे रेल्वेला आवश्यक अशा सर्व सामानाचे कारखाने हिंदुस्थानांतच निघाले पाहिजेत व रेल्वेंना लागणारें कोणतेंहि सामान परदेशांतून येतां कामा नये. सारांश, रेल्वेमुळें देशी उद्योगधंद्यांना पूर्णपणें उत्तेजन मिळालें पाहिजे.


पेडणेकर आणि कंपनी लि.,



शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी.
१७२ गिरगांव रोड, मुंबई.
फोन नं. २२७३८




साठे बिस्किटें

युद्धोत्तरकाळीं आम्ही सर्व ग्राहकांची गरज भागवूं शकूं अशी अपेक्षा होती. पण प्रचलित अन्नपरिस्थितीमुळें वाहतुक व पुरवठा याबाबतचीं नियंत्रणें, तसेंच यंत्र-सामुग्रीची ठराविक उत्पादन-शक्ति, या कारणांमुळें अद्याप पुरवठा अपुरा आहे. म्हणून तूर्त बिस्किटें कमी वापरणें जरूर आहे.

व्यापाऱ्यांनीं स्थानिक स्टॉकिस्टकडे चौकशी करावी




मोठ्या बाटलीस ३॥ रु. ★ लहान २ रु.

# मुंबई शेअर बाजार

( वि. म. लिमये आणि मं. थांजकडून )

साप्ताहिक बंद भाव

| १९४६ मधील चढउतार | दिलेलें व्याज † खंडित S अंतिम | व्याज केव्हां मिळतें | कंपनीचें नांव | मूळ रु. | मंगळवार १८।२।४७ | बुधवार १९।२।४७ | गुरुवार २०।२।४७ | शुक्रवार २१।२।४७ | सोमवार २४।२।४७ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३१७०८; २४२७-८ | १२९-८-९ | ऑगस्ट | टाटा डिफर्ड | ३० | २५३७-८ | | २५६२-८ | २५५५-० | |
| ६३८; ४५७-८ | २३-०-० | ऑगस्ट | टाटा आर्डिनरी | ७५ | ४५४-८ | | ४६२-८ | ४६१-० | |
| ६५; ३६-४ | ०-८-०S | ऑगस्ट | बेंगाल स्टील | १० | ३२-१४ | | ३३-१४ | ३३-१२ | |
| ७१-४; ४४-१० | ०-१४-०S | डिसेंबर | इंडियन आयर्न | १० | ४२-१२ | | ४३-१० | ४३-४ | |
| ३२७७-८; २१२२-८ | २५-०-०† | मार्च-सप्टें. | बॉम्बे डाईंग | २५० | २५६० | | २६१७-८ | २६३० | |
| ११८०; ६५८ | १२-०-०† | मार्च-सप्टें. | कोहिनूर | १०० | ८३३ | | ८४५ | ८४४ | |
| ९९९; ६६० | २२-०-० | मे | स्वदेशी | १०० | ७४८ | | ७५८ | ७७० | |
| ५६७; ३९८ | ७-०-०S | नोव्हें.-एप्रिल | नागपूर | १०० | ३६४ | महाशिवरात्र सुट्टी | ३७० | ३६७ | बाजार बंद |
| ५५२; ३१४ | १५-०-० | मार्च | फिनले | १०० | ३५६ | | ३६८ | ३६७ | |
| ५७१; ३२३ | ६-०-०† | ऑक्टो.-एप्रिल | गोकाक | १०० | ३४१ | | ३५० | ३५४ | |
| ५९४; ३२५-८ | ४-०-०† | जाने.-जुलै | सिंप्लेक्स | ५० | ३६७ | | ३७९ | ३७७ | |
| ७-४-६; ४-८-६ | ०-४-० | मार्च | अपोलो | २ | ४-१२ | | ५-० | ४२१५-६ | |
| २९-१; १६-१२ | ०-१५-० | मे | इंडि. यु. ऑर्डि. | १० | १७-३ | | १८-२ | १८-२-६ | |
| ६-११-६; ३-३-६ | ०-३-० | म | ,, डिफर्ड्स | १ | ३-१२ | | ४-० | ४-०-६ | |
| १०९२-८; ७३५ | ४१-०-० | ऑगस्ट | इंदूर माळवा | १०० | ६३७-८ | | ६६५ | ६७१-४ | |
| २७८; २२५ | ७-०-० | जानेवारी | असो. सीमेंट | १०० | १९८ | | २०२-८ | २०३ | |
| ३७५; २४० | ९-०-० | जानेवारी | बेलापूर शुगर | ५० | २६९ | | २७९ | २९० | |
| ९१०; ६०५ | १०-०-० | डिसेंबर | बॉम्बे बर्मा | १२५ | ५३६-३ | | ५६० | ५५७-८ | |
| ५० ०-१० ३६-१२ | १-४-० | नोव्हेंबर | शिंदिया स्टीम | १५ | ३५-११ | | ३६-८ | ३६-११ | |

शुक्रवार दि. २१-२-४७ चे भाव

| बँका | | वीज कंपन्या | | संकीर्ण | |
|---|---|---|---|---|---|
| बरोडा | १७४-८ | आंध्र व्हॅली | १६०० | अलकॉक | ५६० |
| सेंट्रल | १३४-० | बॉम्बे ट्रॅम | ११७ | न्यू इंडिया | ९६-८ |
| इंडिया | २५०-८ | टाटा हायड्रो | १८४ | शिवराजपुर | ४५-८ |
| इंपी० | २४६० | टाटा पॉवर | १७२५ | टाटा केमिकल | १७-२ |
| | ६२२-८ | | | टाटा ऑईल | ९७-० |
| रिझर्व्ह | १३२-८ | | | विमको | ६५०-० |

शुक्रवार दि. २८-२-४७ ला 'बजेट' असल्यामुळें बाजार दुपारीं १२ ते १ आणि सायंकाळीं ५-३० ते ७-३० पर्यंत उघडा राहील बदले. शनिवारीं होतील.

**रिझर्व्ह बँक कायद्यांत दुरुस्ती**—ब्रह्मदेशांतील चलनाची व्यवस्था त्या देशांतील स्वतंत्र करन्सी बोर्डाकडे देण्यांत येत असल्यामुळें १ एप्रिल १९४७ पासून रिझर्व्ह बँक ही ब्रह्मी सरकारची बँकर रहाणार नाहीं आणि ब्रह्मी चलनाशीं तिचा संबंधहि उरणार नाहीं. १९३४ च्या रिझर्व्ह बँक कायद्यांतील ब्रह्मदेशाचे सर्व उल्लेख काढून टाकण्यासाठीं त्या कायद्यांत आतां दुरुस्ती करण्यांत येत आहे. बँकेचें रंगून शेअर रजिस्टर रद्द करून, रंगून रजिस्टरनें निवडण्याचा डायरेक्टर मद्रास रजिस्टरकडे वर्ग केला जाईल. भागीदारांनीं निवडून द्यावयाच्या आठ डायरेक्टरांपैकीं मुंबई, कलकत्ता आणि दिल्ली ह्या गटांस प्रत्येकी दोन व मद्रास आणि रंगून ह्यांना प्रत्येकी एक असे डायरेक्टर निवडून देता येतात. आतां मद्रासच्या वांट्यास दोन डायरेक्टर येतील. ब्रह्मी नागरिकांना आतां रिझर्व्ह बँकेचे भागीदार रहातां येणार नाहीं. इंडिया अँड बर्मा ( बर्मा मोनेटरी अरेंजमेंटस ) ऑर्डर, १९३७ च्या दुसऱ्या भागाच्या २१ व्या परिच्छेदाप्रमाणें ब्रह्मी सरकारनें हिंदुस्थान सरकारास नोटीस दिली आहे आणि चलनाची संयुक्त व्यवस्था रद्द करण्याचें ठरविलें आहे, त्यास अनुसरून वरील दुरुस्ती होत आहे.

**श्री. भा. म. गुप्ते**—श्री. भालचंद्र महेश्वर गुप्ते, एम. ए., एलएल. बी., ह्यांची महाराष्ट्र बँकेच्या डायरेक्टर बोर्डावर निवडणूक झाली आहे. बँकेच्या स्थापनेपासून ते बोर्डाचे सभासद होते; परंतु मध्यंतरीच्या कॉंग्रेस चळवळींतील कारागृहवासामुळें त्यांच्या संचालकत्वांत खंड पडला होता. आतां ते पुनः आपल्या जागीं आले आहेत. श्री. र. चिं. सोहोनी हे निवृत्त झाले आहेत.


**मुंबई—कूळ—कायदा**

( ता. १ जानेवारी १९४७ पर्यंत सुधारलेला, ता. ४ जानेवारी १९४७ च्या कानू व नमुन्यांसह )

" लॉ ॲकॅडेमीनें प्रस्तुत ग्रंथ काळजीपूर्वक तयार केला असून त्याची उपयुक्तता व ताजेपणा हीं निर्विवाद आहेत."

—अर्थ, ता. १२-२-४७

पृ. सं. १६६ — किं. १ रु. ८ आ.

लॉ ॲकॅडेमी, ७१०, सदाशिव पेठ, पुणें २

**फळांपासून टिकाऊ पदार्थ करण्यासाठीं सहकारी संस्थाः श्री. न. गं. आपटे ह्यांचा पुढाकार**

सध्यां फळबागांची लागवड मोठ्या प्रमाणांत होत असल्यानें व सर्व मालाचा योग्य दरानें खप होत नसल्यानें फळबागवाल्यांचे नुकसान. होतें. हें नुकसान टाळण्यासाठीं ज्या हंगामांत फळांना भाव येत नाहीं त्या हंगामांत संघटितपणें फळांपासून टिकाऊ पदार्थ तयार करण्याचे ठरविल्यास त्यास सरकारकडून पाठिंबा मिळेल. यासाठीं निश्चित योजना सरकारपुढें मांडण्यासाठीं या सहकारी प्रयत्नांत कोण समाविष्ट होण्यास तयार आहेत त्यांनीं आपलीं नांवें श्री. न. गं. आपटे, ९५२ सदाशिव, पुणें २, पो. बा. नं. ३३, यांचेकडे कळवावींत. नांवें कळवींत असतांना नांव, गांव, पत्ता, बागेचें क्षेत्र, फळाचें नांव, टिकाऊ पदार्थ तयार करण्यास लागणारी १५'×२०' एवढी जागा बांधण्याची तयारी आहे काय? त्यास लागणारी यंत्रसामुग्री विकत घेण्याची तयारी आहे काय ? वगैरे माहिती कळवावी. प्रथमतः अकरा बागायतदारांचीच संघटना करावयाची आहे. ही माहिती शक्य तितक्या लवकर पाठवावी अशी विनंति आहे.

---

**फळांपासून टिकाऊ पदार्थ करण्यासाठीं शेतकऱ्यांना साखर मिळण्याची शक्यता**

महाराष्ट्रांत सध्या लहान लहान फळबागा वाढत आहेत. या बागेंतील फळांना अनेकवेळा योग्य किंमत येत नाहीं व शेती आतबट्ट्याची होते. अशा वेळीं या फळांपासून टिकाऊ पदार्थ तयार करावयाचा प्रयत्न प्रत्यक्ष बागा असलेल्या शेतकऱ्यांनीं केल्यास त्यांना हिंदुस्थान सरकारकडून साखर मिळण्याची शक्यता आहे. साखर किती प्रमाणांत लागेल याचा अंदाज महिनाअखेर कळवावयाचा आहे. तरी ज्यांच्या प्रत्यक्ष फळांच्या बागा आहेत व जे फळांपासून टिकाऊ पदार्थ करूं इच्छितात त्यांनीं आपलें नांव, गांव, पत्ता, बाग केवढी आहे, फळें कोणतीं होतात, टिकाऊ पदार्थ कोणते करणार व साखर किती लागेल याची माहिती शक्य तितक्या तांतडीनें चिटणीस महाराष्ट्र खाद्यपदार्थ निर्मिति संघ ९५२ सदाशिव, पुणें, यांजकडे पाठवावी. ही माहिती क्रमवार एकत्रित करून योग्य अधिकाऱ्यांकडे पाठविण्यांत येईल.

---

**युद्धजन्य काळोखाचा बळी**

एका खलाशांचा युद्धजन्य धोक्याचा विमा उतरविलेला होता. एक दिवस बोटीच्या डेकवर टेहेळ्या म्हणून तो कामगिरीवर असतांना त्याला दुसऱ्या टेहेळ्याला खालच्या मजल्यावरून बोलावून आणण्याची आज्ञा झाली. त्यावेळीं ती बोट आरमाराच्या संरक्षणांत होती व सरकारी अधिकाऱ्यांच्या हुकुमावरून सर्वत्र पूर्ण काळोख केलेला होता. विमेदार खलाशी खाली गेला व काळोखामुळें चुकीच्या दरवाजाकडे वळून एकदम खूप उंचीवरून खालीं कोसळला व त्याचा डावा हात दुखावला गेला. त्यानें विमा अधिकाऱ्यांकडे नुकसानभरपाईची मागणी केली. पण ते म्हणाले, विमेदाराला पोचलेली नुकसानी कांहीं युद्धजन्य धोक्यामुळें पोचलेली नाहीं. परंतु पेन्सिलव्हेनियाच्या डिस्ट्रिक्ट कोर्टाचें मत निराळें पडलें. विमेदाराचा हात मोडला त्याचें लगतचें कारण म्हणजे काळोख व तो काळोख सरकारी आरमारी अधिकाऱ्यांच्या हुकुमामुळें व बोट आरमाराच्या संरक्षणाखालीं असतांना करण्यांत आलेला होता. सबब विमेदारास पोचलेलें नुकसान युद्धजन्यच असून त्याची भरपाई त्यास मिळाली पाहिजे.

---


लग्नसमारंभास व मेजवानींसाठी

—रुप्रॉक्सचा—

शुद्ध साखरेचा केशरयुक्त

:: सुधारस ::

वापरा

बाटली किंमत २-८-०


घाऊक माल घेतल्यास स्वस्त देऊं.

मागविण्याचा पत्ताः—एम्पायर एजन्सी,

९५२, सदाशिव, लक्ष्मीरोड, पुणें २.


**'अर्थ' ग्रन्थमाला.**

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार


पुणें चीफ एजंटः—

न्यू दत्त एजन्सी,

१००, रविवार पेठ, मोती चौक, पुणें








हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व रा. रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गानिवास,' ८२३, शिवाजीनगर, (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.